# पुणे महानगरपालिका

## * स्थायी समिती *

## कार्यपत्रिका क्रमांक ४

स्थायी समितीची साप्ताहिक सभा **मंगळवार दि. २७/४/२०२१** रोजी सकाळी ११:०० (अकरा) वाजता **स्थायी समिती सभागृह, दुसरा मजला, पुणे महानगरपालिकेची नवीन विस्तारीत इमारत येथे भरेल.**

सदर सभेत खालील विषयांचा विचार होईल.

**वृत्तांत कायम करणे.**

### उप आयुक्त, विभागीय कार्यालय यांचे कामकाजाचा आढावा

विषय क्र. ८८

उप आयुक्त, परिमंडळ क्र. ४ कार्यालयाचे नियंत्रणाखालील हडपसर–मुंढवा, वानवडी–रामटेकडी, कोंढवा–येवलेवाडी क्षेत्रीय कार्यालयांकडील दि. १/३/२०२१ ते दि.३१/३/२०२१ चा मासिक अहवाल निदर्शनास आणणेबाबत मा.उप आयुक्त, परिमंडळ क्र. ४ यांचे जा.क्र. उआप–४/१२४ दि.१९/४/२०२१ चे पत्र.

### मा.सभासदांचे प्रस्ताव

विषय क्र. ८९

**मा.सौ.दिपाली धुमाळ, विरोधी पक्षनेत्या यांचे दि. २०/४/२०२१ चे पत्र.**

पुणे शहरात कोरोनाचा प्रादुर्भाव झपाट्याने वाढत आहे. तसेच रेमडिसिवर इंजेक्शन (injection) तुटवडा मोठ्या प्रमाणात भासत आहे. पुणे जिल्हा परिषद रेमडेसिविर इंजेक्शन(injection) थेट कंपनीकडुन खरेदी करते. पुणे महानगरपालिकेने सुद्धा रेमडिसिवर (injection) इंजेक्शनसाठी १ कोटीची निविदा काढली आहे. तरी सद्याची परिस्थिती पाहता पुणे महानगरपालिकेने देखील पुणे जिल्हा परिषदप्रमाणे रेमडिसिवर (injection) इंजेक्शन थेट कंपनीकडुन खरेदी करावी.

### मागील सभेचे विषय

विषय क्र. ९०

पुणे पेठ शिवाजीनगर डेक्कन जिमखाना प्लॉट नं.७५९/५ ही पुणे महानगरपालिकेने भाडेतत्वावर घेतलेली मिळकत शाळेची इमारत धोकादायक झालेली असल्याने बंद आहे. यास्तव सदर मिळकत मूळ मालक ट्रस्टी डेक्कन जिमखाना यांना परत करणेस मा.स्थायी समिती मार्फत मा.मुख्यसभेची मान्यता मिळणेबाबत मा.महापालिका आयुक्त यांचे जा.क्र.मआ/माल.व्यव/१०१८,दि,२२/०३/२१ रोजीचे पत्रावर झालेला शहर सुधारणा समितीचा ठराव क्र.१८६,दि.२६.०३.२०२१ विचारासाठी.

(टिप : सदर विषयाचा विचार १५ दिवसांनी करावा असे दि. १२/४/२०२१ च्या सभेत ठरले होते.)

विषय क्र. ९१

पुणे महानगर परिवहन महामंडळाचे सन २०१९–२० या आर्थिक वर्षातील संचलन तूट बाबत मा.सह महा.आयुक्त (मुख्य लेखापरिक्षक) यांनी जा.क्र. मुलेप/२०९९ दि. १०/२/२०२१ ने केलेला लेखापरिक्षण अहवाल विचारासाठी.

(टिप : सदर विषयाचा विचार पुढील सभेत करावा असे दि. २०/४/२०२१ च्या सभेत ठरले होते.)

शिवाजी दौंडकर
नगरसचिव,
पुणे महानगरपालिका.

(टिप :– प्रस्तुत कार्यपत्रिकेवरील विषयांची कागदपत्रे (डॉकेटस) नगरसचिव यांच्या कार्यालयात वाचण्यासाठी ठेवली आहेत.)